**पुणे महानगरपालिका**
**जाहिरात प्रकटन**

पुणे महानगरपालिका प्रशासनाकडील खालील पदांसाठी निवडयादी तयार करणेकरीता खालीलप्रमाणे शैक्षणिक पात्रता व अनुभव धारक उमेदवारांकडून ऑनलाइन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

ऑनलाईन अर्ज करण्यासाठी पुणे मनपाच्या www.punecorporation.org या संकेतस्थळावर (Recruitment या ठिकाणी उपलब्ध केलेल्या http://pmc.erecruitment.co.in येथे) किंवा http://pmc.erecruitment.co.in या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज करता येतील.

| अ. क्र. | पदनाम / खात्याचे नाव | वेतन श्रेणी पे बॅण्ड (रुपये) | शैक्षणिक पात्रता व अनुभव | पदांची संख्या | गट | समांतर आरक्षण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ॲनॅस्थेटिक रजिस्ट्रार (वर्ग – ब)<br><br>आरोग्य | ९३०० ते ३४८०० + ग्रेड पे ५९०० + मान्य भत्ते | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाची वैद्यकीय पदवी (एम.बी.बी.एस.)<br>२) मान्य विद्यापीठाची वैद्यकिय पदव्युत्तर पदवी (एम.डी.ॲनेस्थेशिया)<br>**किंवा**<br>१) मान्यताप्राप्त विद्यापीठाची वैद्यकीय पदवी (एम.बी.बी.एस.)<br>२) मान्यताप्राप्त विद्यापीठाची वैद्यकिय पदव्युत्तर पदवीका (डिप्लोमा इन ॲनेस्थेशिया)<br>**अनुभव :–** पदव्युत्तर पदवी धारकांना कामाचा २ वर्षाचा व पदव्युत्तर पदवीका धारकांना ५ वर्षाचा अनुभव. | १ | सर्वसाधारण | – |
| २ | वरिष्ठ लघुलेखक (वर्ग – ब )<br><br>नगरसचिव | ९३०० ते ३४८०० + ग्रेड पे ५९०० + मान्य भत्ते+ विशेष वेतन | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी.<br>२) शासनाची मराठी लघुलेखन १२० श.प्र.मि. परिक्षा उत्तीर्ण.<br>३) शासनाची मराठी ४० किंवा इंग्रजी ४० श.प्र.मि. वेगाची टंकलेखनाची परिक्षा उत्तीर्ण.<br>**अनुभव :–** लघुलेखक (निम्नश्रेणी) संवर्गातील कामाचा ३ वर्षाचा अनुभव. | १ | अजा | – |
| ३ | क्युरेटर (वर्ग – ब)<br><br>उद्यान | ९३०० ते ३४८०० + ग्रेड पे ४४०० + मान्य भत्ते | मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदव्युत्तर पदवी एम.एस.सी. (वाईल्ड लाईफ मॅनेजमेंट) **किंवा** एम.एस.सी. (वाईल्ड लाईफ / बायोलॉजी कन्झर्वेशन)<br>**अनुभव :–** संबंधित कामाचा ५ वर्षाचा अनुभव | १ | सर्वसाधारण | – |
| ४ | व्हॅक्सिनेशन सुपरिटेंडंट | ९३०० ते ३४८०० + ग्रेड पे ५२०० | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाची वैद्यकीय पदवी (एम.बी.बी.एस.) | १ | सर्वसाधारण | – |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | (वर्ग – क) आरोग्य | + मान्य भत्ते | **अनुभव :–** संबंधित कामाचा २ वर्षाचा अनुभव | | | |
| **अ. क्र.** | **पदनाम / खात्याचे नाव** | **वेतन श्रेणी पे बॅण्ड (रुपये)** | **शैक्षणिक पात्रता व अनुभव** | **पदांची संख्या** | **गट** | **समांतर आरक्षण** |
| ५ | कार्डिओग्राफर (वर्ग – क) आरोग्य | ९३०० ते ३४८०० + ग्रेड पे ५२०० + मान्य भत्ते | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाची विज्ञान शाखेची पदवी (भौतिक / जीव / रसायन शास्त्र यापैकी एका विषयासह उत्तीर्ण) किंवा तत्सम<br>२) शासनमान्य संस्थेतील इसीजी तंत्रज्ञाचे प्रशिक्षण पूर्ण.<br>**अनुभव–** शासनमान्य संस्थेतील इसीजी तंत्रज्ञ म्हणून कामाचा १ वर्षाचा अनुभव | १ | सर्वसाधारण | – |
| ६ | टेलिफोन टेक्निशियन (वर्ग – क) दूरध्वनी विभाग | ५२०० ते २०२०० + ग्रेड पे ३९००+ मान्य भत्ते | १) माध्यमिक शालांत परिक्षा (एस.एस.सी.) व तत्सम<br>२) मान्य संस्थेचा डिप्लोमा इन टेलिकम्युनिकेशन<br>**अनुभवः–** नेटवर्किंगचे कामाचा ३ वर्षाचा अनुभव आवश्यक. | १ | सर्वसाधारण | – |
| ७ | मोटार सारथी/ फायर इंजिन ड्रायव्हर (वर्ग –क) व्हेईकल डेपो | ५२०० ते २०२०० + ग्रेड पे. १९०० + मान्य भत्ते | १) माध्यमिक शालांत परिक्षा (एस.एस.सी.) व तत्सम<br>२) आर.टी.ओ.चा जड वाहन चालविण्याचा किमान ४ वर्षाचा परवाना<br>**अनुभव :–**परवाना मिळाल्यानंतर वाहन चालिवण्याचा किमान ३ वर्षांचा अनुभव. | | | |

| **जातीचा प्रवर्ग** | **भरावयाची एकूण पदे** | **अंशकालीन उमेदवार १०%** | **महिला ३०%** | **माजी सैनिक १५%** | **प्रकल्पग्रस्त ५%** | **भूकंपग्रस्त २%** | **खेळाडू ५%** | **इतर (समांतर आरक्षणा व्यतिरिक्त)** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **अ. जाती** | १० | १ | ३ | २ | १ | – | १ | २ |
| **अ. जमाती** | १ | – | – | – | – | – | – | १ |
| **वि.जा.अ** | ० | – | – | – | – | – | – | – |
| **भ.ज.ब** | ३ | – | १ | – | – | – | – | २ |
| **भ.ज.क** | ० | – | – | – | – | – | – | – |
| **भ.ज.ड** | ० | – | – | – | – | – | – | – |
| **वि.मा.प्र.** | १ | – | – | – | – | – | – | १ |
| **इमाव** | ० | – | – | – | – | – | – | – |
| **खुला** | १९ | २ | ६ | ३ | १ | – | १ | ६ |
| **एकूण** | **३४** | **३** | **१०** | **५** | **२** | – | **२** | **१२** |

| अ. क्र. | पदनाम / खात्याचे नाव | वेतन श्रेणी पे बॅण्ड (रुपये) | शैक्षणिक पात्रता व अनुभव |
|---|---|---|---|
| ८ | फायरमन (वर्ग -ड)<br><br>अग्निशमन दल | ४४४० ते ७४४०<br>+ ग्रेड पे.१६००<br>+ मान्य भत्ते | १) माध्यमिक शालांत परिक्षा (एस.एस.सी.)व तत्सम<br>२) राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्राचा ''अग्निशमन प्रशिक्षण पाठयक्रम'' पूर्ण.<br>३) शरीरप्रकृती निकोप असणे व पोहता येणे आवश्यक.<br>४) शारिरीक पात्रता खालीलप्रमाणे- उंची =५ फुट ६ इंच (१६५ सेंमी.)<br>वजन = ५० किलोग्रॅम, छाती = ३२ इंच (८१ सें.मी) न फुगवता<br>छाती = ३४ इंच ( ८६ सें.मी) फुगवून, दृष्टी = निर्दोष असावी, चष्मा नसावा. |

| जातीचा प्रवर्ग | भरावयाची एकूण पदे | अंशकालीन उमेदवार १०% | महिला ३०% | माजी सैनिक १५% | प्रकल्पग्रस्त ५% | भूकंपग्रस्त २% | खेळाडू ५% | इतर (समांतर आरक्षणा व्यतिरिक्त) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **अ. जाती** | - | - | - | - | - | - | - | - |
| **अ. जमाती** | ७ | १ | - | १ | - | - | - | ५ |
| **वि.जा.अ** | २ | - | - | - | - | - | - | २ |
| **भ.ज.ब** | - | - | - | - | - | - | - | - |
| **भ.ज.क** | २ | - | - | - | - | - | - | २ |
| **भ.ज.ड** | १ | - | - | - | - | - | - | १ |
| **वि.मा.प्र.** | - | - | - | - | - | - | - | - |
| **इमाव** | ४ | - | - | १ | - | - | - | ३ |
| **खुला** | ५ | १ | - | १ | - | - | - | ३ |
| **एकूण** | **२१** | **२** | **-** | **३** | **-** | **-** | **-** | **१६** |

पुणे महानगरपालिकेच्या विविध कार्यालयातील गट-ब , गट- क व गट-ड मधील संवर्गनिहाय, पदनिहाय तपशिल वरील तक्त्यात दर्शविण्यात आला आहे. त्यानुसार पात्र उमेदवारांकडून खालील अटी व शर्तीस अधीन राहून स्पर्धा परिक्षेसाठी (लेखी) महाराष्ट्र ज्ञान महामंडळ (MKCL) यांच्यामार्फत ऑनलाईन अर्ज मागविणेत येत आहेत.

१) उपरोक्त पदांची संख्या कमी-जास्त होण्याची शक्यता आहे.

२) समांतर आरक्षणानुसार माजी सैनिक, महिला, अपंग, प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त, खेळाडू इ. प्रवर्गातील उमेदवारांना देय असलेल्या सवलती देण्यात येतील.

३) अंशकालीन कर्मचारी, स्वातंत्र्य सैनिकाचे नामनिर्देशित पाल्य उमेदवारांना देय असलेल्या सवलती देण्यात येतील.

४) सदरची पदे भरणेसाठीची निवड यादी व प्रतिक्षा यादी १ वर्षे मुदतीसाठी किंवा पुढील सेवा भरतीची जाहिरात देणेत येईल त्या दिनांकापर्यंत यापैकी जो आधी घडेल त्या दिनांकापर्यंत विधीग्राहय ठरेल. तदनंतर ही निवड सुची व्यपगत होईल.

५) समांतर आरक्षणांतर्गत त्या त्या प्रवर्गासाठी विहीत केलेल्या टक्केवारीनुसार वाटा निश्चितपणे मिळणेसाठी त्या त्या प्रवर्गातील उमेदवारांतून जागा भरण्यात येतील.

६) काही अपरिहार्य कारणाने परिक्षा स्थगीत झाल्यास त्याबाबत अर्जदाराला कोणताही दावा सांगता येणार नाही. परिक्षेचा प्रकार, पदांची संख्या, समांतर आरक्षण व सामाजिक आरक्षण याबाबत बदल करणे, परिक्षा स्थगित करणे व रद्द करणे, अंशतः बदल करणे तसेच सेवाभरती प्रक्रियेत बदल करणे याबाबतचे सर्व अधिकार मा. महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका स्वतःकडे राखून ठेवित आहे. भरती प्रक्रियेसंदर्भात उद्‌भवणारे वाद, तक्रारी इ. बाबत सदर महानगरपालिका प्रशासनाचा निर्णय अंतिम राहील.

७) अंध उमेदवाराने सर्वसाधारण प्रवर्गातून अर्ज केल्यास उमेदवारांने मदतनीसासाठी लेखी अर्ज करून महापालिका आयुक्त यांची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक राहील.

८) वयोमर्यादा :- उमेदवाराचे वय जाहिरातीच्या दिनांकास किमान १८ वर्षे पुर्ण तर खुल्या प्रवर्गासाठी कमाल ३३ वर्षे व मागासवर्गीय उमेदवारांसाठी कमाल ३८ वर्षे अशी राहील. तसेच सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांजकडील शासन निर्णय क्र. पअंक-१००९/प्र.क्र.२००/२००९/१६-अ, दि.२७.१०.२००९ नुसार अंशकालीन उमेदवारांसाठी कमाल ४६ वर्षे असावे. पुणे मनपा आस्थापनेवरील कायम कर्मचाऱ्यांना कमाल वयोमर्यादेची अट नाही.

९) जणगणना (सन १९९१ ची) उमेदवारांसाठी कार्यालयातील सलग सेवेचा कालावधी अधिक ५ वर्षे शिथील केली जाईल. त्याबाबत अर्जदार / उमेदवार यांनी शासन निर्णय क्र.१०९७/प्र.क्र.७७/९७१६-अ, दि.१२.०३.१९९८ मधील निकष पूर्ण केलेले असावे.

१०) सामान्य प्रशासन विभाग यांजकडील शुध्दीपत्रक दिनांक २०.०८.२०१० अन्वये माजी सैनिकांसाठी शासनसेवतील वर्ग-क व वर्ग-ड मधील पदासाठी नेमणूकीकरीता विहित वयोमर्यादेतील सुट ही सदर उमेदवाराच्या सशस्त्र दलात झालेल्या सेवेइतका कालावधी अधिक ३ वर्षे इतकी राहील.

११) शासन निर्णयानुसार जाहिरात प्रसिध्द केल्याच्या दिनांकाचे दिवशी उमेदवाराचे वय उपरोक्त मर्यादेमध्ये असणे आवश्यक आहे.

१२) संगणक अर्हता पात्र प्रमाणपत्र DOACC सोसायटीच्या अधिकृत CCC किंवा O स्तर किंवा A स्तर किंवा B स्तर किंवा C स्तर यापैकी कोणतीही एक परिक्षा उत्तीर्ण असल्याचे प्रमाणपत्र किंवा (ब) महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील अधिकृत (MS-CIT) परिक्षा उत्तीर्ण असल्याचे प्रमाणपत्र नियुक्ती नंतर विहीत मुदतीत सादर करणे आवश्यक राहील. नसल्यास शासन निर्णय सा.प्र.वि.क्र. प्रशिक्षण २००० /प्रकरण - ६१/२००१/३९, दि.१९.०३.२००३ अन्वये संगणकाची अर्हता नियुक्तीच्या दिनांकापासून २ (दोन) वर्षाच्या आत प्राप्त करणे आवश्यक राहील.

१३) अॅनस्थेटीक रजिस्ट्रार, क्युरेटर, व्हॅक्सिनेशन सुपरिटेंडेंट, कार्डिओग्राफर या पदांकरीता ९० मार्कांची लेखी परिक्षा घेण्यात येईल. लेखी परिक्षेच्या आधारे गुणवत्तेनुसार पात्र ठरणाऱ्या उमेदवारांची १० गुणांची मौखीक परिक्षा घेण्यात येईल. लेखी व मौखिक परिक्षेचे गुण एकत्रित करुन गुणानुक्रमानुसार अंतिम गुणवत्ता यादी तयार केली जाईल.

१४) वरिष्ठ लघुलेखक या पदाकरीता शासन निर्णय दि.१९.१०.२००७ नुसार पात्र उमेदवारांची प्रथम ५० गुणांची लेखी परिक्षा घेण्यात येईल. लेखी परिक्षेमध्ये पात्र झालेल्या उमेदवारांची ४० गुणांची व्यावसायीक चाचणी घेण्यात येईल. व्यावसायीक चाचणीमध्ये पात्र झालेल्या उमेदवारांची १० गुणांची मौखीक चाचणी घेण्यात येईल. लेखी, व्यावसायीक व मौखिक परिक्षेचे गुण एकत्रित करुन गुणानुक्रमानुसार अंतिम गुणवत्ता यादी तयार केली जाईल.

१५) टेलिफोन टेक्निशियन या पदाकरीता पात्र उमेदवारांची ५० मार्कांची लेखी परिक्षा घेण्यात येईल. लेखी परिक्षेच्या आधारे गुणवत्तेनुसार पात्र ठरणाऱ्या उमेदवारांची ४० मार्कांची तांत्रिक परिक्षा व १० मार्कांची मौखीक परिक्षा घेण्यात येईल. लेखी, तांत्रिक व मौखिक परिक्षेचे गुण एकत्रित करुन गुणानुक्रमानुसार अंतिम गुणवत्ता यादी तयार केली जाईल.

१६) मोटारसारथी / फायर इंजिन ड्रायव्हर पदाकरीता पात्र उमेदवारांची १०० गुणांची लेखी परिक्षा घेण्यात येईल. लेखी परिक्षेच्या आधारे गुणवत्तेनुसार पात्र ठरणाऱ्या उमेदवारांची निवड करण्यात येईल. निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्तीपूर्वी तांत्रिक चाचणी द्यावी लागेल.

१७) फायरमन पदाकरीता पात्र उमेदवारांची ६० गुणांची लेखी परिक्षा व ४० गुणांची शारिरीक क्षमता चाचणी घेण्यात येईल. लेखी परिक्षा व शारिरीक पात्रतेची चाचणीतील गुणांचे आधारे गुणवत्तेनुसार पात्र ठरणाऱ्या उमेदवारांची निवड करण्यात येईल.

१८) जाहिरातीमधील नमूद केलेल्या पदांसाठी आयोजित केलेल्या मौखीक परिक्षेस उमेदवार गैरहजर राहिल्यास उमेदवाराची निवड करण्यात येणार नाही. उमेदवाराने एकूण गुणांच्या किमान ४५% गुण प्राप्त करणे आवश्यक राहील.

१९) शासन निर्णय क्र. रिपभ/प्र.क्र.६६/२०११/ई-१० दि.२७ जुन २०११ नुसार ज्या परिक्षार्थीकडे अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) उपलब्ध नसल्यास त्यांनी त्यांचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याचा जन्म दाखला (Birth Certificate) सादर करणे आवश्यक आहे. अशा प्रकरणांत अधिवास प्रमाणपत्राची अट लागू राहणार नाही.

२०) सदर परिक्षार्थींकडे अधिवास प्रमाणपत्र तसेच जन्म तारखेचा दाखला उपलब्ध नसल्यास, त्या परिक्षार्थीने आपला शाळा सोडल्याच्या दाखला सादर करणे आवश्यक राहील. परंतु सदर शाळा सोडल्याच्या दाखल्यामध्ये त्या परिक्षार्थीचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याची नोंद असणे आवश्यक आहे. अशा प्रकरणांतदेखील अधिवास प्रमाणपत्राची आवश्यकता असणार नाही.

२१) उपरोक्त बाबी फक्त महाराष्ट्र राज्यात जन्म झालेल्या परिक्षार्थींसाठी लागू राहतील. इतर परिक्षार्थी / उमेदवारांसाठी अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) आवश्यक राहील.

२२) उमेदवाराने अर्ज केला अथवा विहीत अर्हता धारण केली म्हणजे परीक्षेला बोलावण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही. प्राथमिक छाननीअंती ज्या उमेदवारांचे अर्ज नाकारण्यात आलेले नाहीत, अशा उमेदवारांना लेखी परीक्षेसाठी तात्पुरता प्रवेश दिला जाईल.

२३) आरक्षित मागास प्रवर्गाचा दावा करणाऱ्या उमेदवारांना त्या संदर्भातील सक्षम अधिकाऱ्याने दिलेले जात प्रमाणपत्र (Cast Certificate) व उपलब्ध असल्यास जात वैधता प्रमाणपत्राची (Cast Validity Certificate) साक्षांकित प्रती निवडअंती सादर करणे आवश्यक आहे.

२४) जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास, शासन सामान्य प्रशासन विभाग निर्णय क्र.बीसीसी-२०११/प्र.क्र.-१०६४/२०११/१६-ब, दि.१२.१२.२०११ मधील तरतूदीनुसार याचिका क्र.२१३६/२०११ व अन्य याचिकांवर मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडीपीठाने दिनांक २५.०८.२०११ रोजी दिलेल्या आदेशाच्या विरोधात मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे दाखल केलेल्या एसएलपी मधील आदेशाच्या अधीन राहून तात्पुरती नियुक्ती आदेश निर्गमित केल्याच्या दिनांकापासून ६ महिन्याचे आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे, अन्यथा त्यांची नियुक्ती पुर्वलक्षी प्रभावाने रद्द करण्यात येईल.

२५) उमेदवारांना लेखी परीक्षा, व्यावसायीक चाचणी व मुलाखतीसाठी स्वखर्चाने यावे लागेल. लेखी परीक्षा पुणे शहरातील कोणत्याही परीक्षा केंद्रावर घेण्यात येईल.

२६) एखाद्या अर्जदाराने त्याची निवड करण्यासाठी निवड समितीवरील अध्यक्ष, सदस्य तसेच अधिकाऱ्यांवर प्रत्यक्ष / अप्रत्यक्ष राजकीय अथवा अन्य प्रकाराने दबाव आणल्यास अथवा गैरप्रकाराचा अवलंब केल्यास त्यास निवड प्रक्रियेतून अपात्र ठरविण्यात येईल.

२७) लेखी परीक्षेमध्ये फक्त काळया शाईच्या बॉलपेनचा वापर करणे बंधनकारक आहे

२८) शासन सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्र. एसआरव्ही - १०९७/प्र.क्र.३१/९८/१६-अ, दि.१६.०३.१९९९ अन्वये समांतर आरक्षणातील प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध झाले नाही तर, समांतर आरक्षणातील त्या त्या प्रवर्गातील उमेदवारांना उपलब्धतेनुसार पर्याप्त संख्येत यादीतील शेवटचे उमेदवार वगळून समाविष्ठ करण्यात येतील.

२९) नियुक्ती होणाऱ्या उमेदवारास शासन निर्णय दि.०१.११.२००५ नुसार लागू करण्यात आलेली परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना(CPS) लागू राहील.

३०) एकाच स्थानासाठी (Position) दोन किंवा अधिक उमेदवारांना समान गुण मिळाल्यास सामान्य प्रशासन विभाग यांजकडील शासन निर्णय क्र.प्रानिमं-२००७/प्र.क्र.४६/०७/१३-अ,

दि.२७.०६.२००८ मधील निर्णयामध्ये नमूद केल्यानुसार प्राधान्य क्रमाच्या आधारे उमेदवाराची अंतिम निवड केली जाईल.

३१) वरील पदांवर महानगरपालिकेच्या सेवेत नियुक्त होणारा उमेदवार पुणे महानगरपालिकेच्या अधिनस्त कोणत्याही कार्यालयात बदली योग्य राहील.

३२) अपंग उमेदवारांनी किमान ४०% अपंगत्व असलेबाबतचे जिल्हा शल्य चिकित्सक रुग्णालयाकडील प्रामाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

३३) अंतिम निवड यादी व प्रतिक्षा यादीमधील निवड झालेल्या उमेदवारांनी पात्रतेबाबत सादर करावयाची कागदपत्रे.

अ. पदवीधर अंशकालीन, माजी सैनिक या समांतर आरक्षण प्रवर्गातून अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी त्या समांतर आरक्षण प्रवर्गात मोडत असलेबाबतचे सक्षम प्राधिकारी यांचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

ब. सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील पत्र क्र. पअं-१०१०/७१७/प्र.क्र.३२२/१०/१६-अ, दि.२६ ऑगस्ट २०१० पत्रान्वये एकदा नोकरी मिळालेनंतर पुन्हा दुसऱ्या पदावर नोकरी मिळविण्यासाठी त्यास समांतर आरक्षणाचा लाभ देणे हे शासन धोरणाशी विसंगत आहे. एकदा उमेदवाराने समांतर आरक्षणाचा लाभ घेतला असल्यास त्या उमेदारास पुन्हा समांतर आरक्षणाचा लाभ देता येणार नाही. त्यानुसार आरक्षणाचा लाभ घेतलेला नाही किंवा घेणार नाही याबाबतचे प्रतिज्ञापत्र सादर करणे बंधनकारक राहील.

क. महिला आरक्षण हे शासन निर्णय महिला व बालकल्याण विभाग ८२/२००१ म.से.आ - २०००/ प्र.क्र.४१५/का-२, दिनांक २५.०५.२००१ मधील तरतूदीनुसार राहील. खुल्या प्रवर्गातील महिलांना उन्नत व प्रगत व्यक्ती व गट यामध्ये मोडत नसल्याबाबतचे सक्षम अधिकारी यांचे दिनांक ३१.०३.२०१४ या दिनांकापर्यंत वैध असलेले नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत सादर करणे आवश्यक आहे.

ड. सामान्य प्रशासन विभाग शासन अधिसूचना क्र. एसआरव्ही - २०००/प्र.क्र.१७/२०१०/१२, दिनांक २८.०३.२००५ व शासन परिपत्रक क्रमांक एसआरव्ही - २०००/प्र.क्र.१७/२०००/१२, दिनांक ०१.०७.२००५ तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम २००५ अन्वये दिनांक २८.०३.२००५ नुसार रोजी हयात असलेली व त्यानंतर जन्माला आलेली अपत्यांची संख्या बाबत लहान कुटुंब असल्याचे विहीत नमुन्यातील प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे. तसेच अविवाहीत असणाऱ्या उमेदवारानेही विहीत नमुन्यातील प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

इ. शैक्षणिक अर्हता, वय, अनुभव, अधिवास दाखला (Domicile Certificate) तसेच जातीचा दाखला, उपलब्ध असल्यास जात वैधता प्रमाणपत्र, अ.ज./अ.जा. उमेदवार /अर्जदार वगळून इतरांसाठी उन्नत व प्रगत गटात मोडत नसलेबाबत (Non Cremylayer Certificate) इ. प्रमाणपत्रांच्या साक्षांकित

प्रती सादर करणे आवश्यक आहे. साक्षांकित प्रती केंद्र / राज्य शासनाने राजपत्रित अधिकारी, पोस्ट मास्टर, मुख्याध्यापक व याबाबत प्राधिकृत व सक्षम अधिकाऱ्यांनीच केलेले असावे. तसे नसल्यास किंवा चुकीची माहिती असल्यास निवड रद्द समजण्यात येईल.

फ. शासनाचे महिला व बालविकास विभागाकडील निर्णय क्र-८२/२००१/मसेआ-२०००/प्र.क्र.४१५/का.२, दिनांक २५.०५.२००१ अन्वये खुला, विजाअ, भजब, भजक, भजड, विमाप्र व इमाव या प्रवर्गातील महिला उमेदवारांना राखीव पदांसाठी निवड करावयाची असल्यास त्यांना दिनांक ३१.०३.२०१४ या दिनांकापर्यंत वैध असलेल्या नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्राची सांक्षांकित प्रत सादर करणे आवश्यक आहे.

ग. विजाअ, भजब, भजक, भजड, विमाप्र व इमाव या प्रवर्गातील उमेदवारांना सक्षम अधिकाऱ्याचे जात व दिनांक ३१.०३.२०१४ पर्यंत वैध असलेले नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत सादर करणे आवश्यक आहे.

ह. उमेदवार माजी सैनिक असल्यास त्यांना जिल्हा सैनिक बोर्डात नाव नोंदणी केली असल्यास प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत सादर करणे आवश्यक आहे.

३४) अंतरिम निवड यादीमधील पात्र उमेदवारांनी सादर केलेल्या विविध प्रमाणपत्राच्या साक्षांकित प्रती मुळ प्रमाणपत्राच्या आधारे कागदपत्र तपासणीच्या वेळी तपासण्यात येईल. सदर प्रमाणपत्राच्या मुळ प्रती (Original Documents) कागदपत्रे तपासणीच्या वेळी उपलब्ध करुन देणे उमेदवारांवर बंधनकारक राहील. त्यामधील प्रमाणपत्रे खोटी किंवा चुकीची आढळल्यास संबंधित उमेदवार अपात्र ठरविण्यात येईल.

३५) उमेदवाराने लेखी परिक्षेत मिळालेल्या एकत्रित गुणांच्या आधारे व त्या उमेदवाराची कागदपत्रे वैध ठरल्यास अंतिम निवडयादी तयार केली जाईल. अंतरिम निवडयादी मधून पदांच्या आरक्षणानुसार व पदांच्या उपलब्धतेनुसार उमेदवारांची अंतिम निवडयादी तयार केली जाईल

३६) ऑनलाईन अर्ज करावयाची कार्य पध्दती व इतर सुचना :-

जाहिरात काळजीपूर्वक वाचावी.

अ. ऑनलाईन अर्ज : पुणे मनपाच्या www.punecorporation.org या संकेतस्थळावर Recruitment या ठिकाणी उपलब्ध केलेल्या http://pmc.erecruitment.co.in या लिंकवर किंवा http://pmc.erecruitment.co.in या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज करता येतील. ज्या पदासाठी उमेदवार ऑनलाईन अर्ज भरणार आहे त्या पदाची पात्रता जाहिरातीमध्ये काळजीपूर्वक वाचावी. लहान कुटूंब असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्राचा नमूना वरील संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

ब. उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरतेवेळी सर्व आवश्यक कागदपत्रे व स्वतःचा अलीकडील काळातील पासपोर्ट फोटो स्वतःजवळ असल्याची खात्री करावी. अर्ज भरतेवेळी फोटो, सही स्कॅन करून अपलोड करावी.

क. ऑनलाईन अर्ज करणेसाठी उपरोक्त संकेत स्थळावर (Apply Online) या लिंक वर क्लिक करून अर्ज भरणेस सुरूवात करावी.

ड. ज्या पदासाठी अर्ज करावयाचा आहे ते पद निवडा, एक-एक करत आपणांस ऑनलाईन विचारलेल्या प्रश्नांचे उत्तरासाठी योग्य पर्याय निवडा. संगणक प्रणाली तुम्ही दिलेल्या उत्तरांच्या आधारे तुमची प्राथमिक पात्रता तपासेल.

इ. जर प्राथमिक पात्रता चाचणीत आपण पात्र असाल, ज्या पदासाठी अर्ज भरावयाचा आहे ते पद निवडा आणि आवश्यक माहिती भरा.

फ. आवश्यक माहिती भरल्यानंतर संगणक प्रणालीत तुमचा लॉगीन आयडी आणि पासवर्ड निर्माण करून तुम्हाला तुमच्या स्क्रिनवर दाखवेल. आणि तुम्ही पुरविलेला भ्रमणध्वनी क्रमांकावर एसएमएस करेल. (कृपया आपला भ्रमणध्वनी (मोबाईल) क्रमांक अचूक टाकावा.) तुमचा लॉग इन आयडी म्हणजेच तुमचा अर्ज क्रमांक असेल यांची नोंद घ्यावी.

ग. जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र, पुणे/कौशल्यविकास या कार्यालयात व आदिवासी विकास विभागाकडे नावनोंदणी केली असली तरी वरील पदासाठी रितसर ऑनलाईन अर्जाच्या संकेतस्थळावर जाऊन भरणे आवश्यक आहे. उमेदवारांनी अर्जासोबत माहिती सादर करताना सतत कार्यान्वित असलेला भ्रमणध्वनी (मोबाईल) क्रमांक व ई-मेल आयडी नमूद करावा जेणेकरून आपणांस संपर्क करून आवश्यक ती माहिती देणे सुलभ होईल.

ह. तद्नंतर उमेदवारांने प्रिंट चलन (Print Challan) या बटनावर क्लिक करून चलन प्रिंट करावे. या प्रिंट केलेल्या चलनावर नमूद केलेली फी केवळ स्टेट बँक ऑफ इंडियाच्या (State Bank of India) कोणत्याही शाखेमध्ये कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी तसेच खालील दिलेल्या वेळापत्रकात नमूद केलेल्या मुदतीच्या आत भरणे आवश्यक राहील व त्याची एक प्रत उमेदवाराने स्वतःकडे जपून ठेवावी. बँकेत फि भरल्यानंतर उमेदवाराने 'अर्ज भरा' या लिंकवर क्लिक करुन आपला उर्वरीत अर्ज भरून पूर्ण करावा. अर्ज भरताना उमेदवाराने स्वतःचा पासपोर्ट साईजमधील फोटो व सही अपलोड करणे आवश्यक आहे. माहिती पूर्ण भरल्यानंतर उमेदवाराने अर्जाची प्रिंट स्वतः काढावी व कागदपत्रे पडताळणीचे वेळी सादर करणेसाठी जतन करुन ठेवावी.

वरील सर्व (उमेदवार नोंदणी, बँक प्रक्रिया व उर्वरीत अर्ज भरणे) प्रक्रिया पूर्ण केल्यानंतरच उमेदवार लेखी परीक्षा / व्यावसायीक चाचणी देण्यासाठी पात्र होईल.

अर्जाचे वेळापत्रक :-

| **अ. क्र.** | **तपशील** | **कालावधी दिनांक** | |
|---|---|---|---|
| | | **पासून** | **पर्यंत** |
| १ | ऑनलाईन अर्ज करण्याचा कालावधी | ०३/०३/२०१४ | १७/०३/२०१४ |
| २ | संगणकीय चलनाद्वारे स्टेट बँक ऑफ इंडियाच्या शाखांमध्ये फी स्विकृतीचा कालावधी | ०४/०३/२०१४ | १९/०३/२०१४ |
| ३ | ज्यांचे अर्ज दि. १७/०३/२०१४ रोजी दाखल झाले | २२/०३/२०१४ | |

| | | |
|---|---|---|
| | आहेत व ज्या उमेदवारांनी बँकेमध्ये दि.१९/०३/२०१४ पर्यंत भरती प्रक्रिया शुल्क जमा केले असेल त्यांच्यासाठी उरलेला ऑनलाईन अर्ज भरण्याचा कालावधी | २२/०३/२०१४ |

३७) माहिती भरल्यानंतर उमेदवाराने अर्जाची प्रिंट स्वतः काढून पुढील भरती प्रक्रियेसाठी आपल्या माहितीसाठी जतन करून ठेवावी. अर्जदाराने नियमितपणे वेबसाईट्सला भेट द्यावी ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर अर्जाची प्रत प्रिंट काढून पुणे महानगरपालिका कार्यालयाकडे पाठविण्याची आवश्यकता नाही.

३८) पदासाठी असणारी किमान अर्हता आणि पात्रता धारण करणाऱ्या व लेखी परिक्षेस पात्र ठरणाऱ्या उमेदवारांना या पदासाठी घेण्यात येणारी परिक्षेची रूपरेषा, वेळापत्रक, प्रवेशपत्र, परिक्षा केंद्र, बैठक क्रमांक इ.बाबतची माहिती पुणे महानगरपालिकेच्या अधिकृत /MKCL च्या संकेतस्थळावर उपलब्ध राहील.

३९) ज्या उमेदवारांनी ऑनलाईन नोंदणी केली आहे आणि आवश्यक आवेदन शुल्क मुदतीत आदा केले आहे व संपूर्ण माहिती भरून प्रिंट काढलेली आहे त्यांना लेखी परिक्षेचे प्रवेशपत्र (हॉल तिकीट) त्यांच्या लॉगीन आयडीद्वारे MKCL च्या वरील नमूद संकेत स्थळावरून डाऊनलोड करता येईल. यासाठी वेगळा पत्रव्यवहार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

४०) परिक्षाकेंद्रावर ओळखपत्रासह परिक्षा सुरू होणेपूर्वी एक तास अगोदर उपस्थित राहणे आवश्यक आहे. उशिरा येणाऱ्या व प्रवेशपत्र न आणणाऱ्या उमेदवारांना परिक्षेकरिता प्रवेश दिला जाणार नाही, तसेच उमेदवारांनी स्वतःचे फोटो असलेले ओळखपत्र उदा.वाहन परवाना, पॅनकार्ड, निवडणूक ओळखपत्र इ.सोबत आणणे बंधनकारक राहील.

४१) उमेदवारांना ऑनलाईन अर्ज भरण्याबाबत काही अडचणी आल्यास त्यांनी ९३२६५५२५२५ या क्रमांकावर संपर्क साधावा.

४२) अर्जामध्ये नमूद केलेली माहिती चूकीची अथवा खोटी आढळून आल्यास संबंधित उमेदवार दंडात्मक कारवाईस पात्र राहील. तसेच चुकीच्या माहितीच्या आधारे नियुक्ती झाल्यास तात्काळ सेवेतून काढून टाकणेस पात्र राहील व भा.दं.वि. संहिताचे कलम १९९ व २०० (२) प्रमाणे कारवाई पात्र राहील.

४३) जाहिरातीमधील नमूद पदांच्या भरती परिक्षेचा दिनांक व वेळ कार्यक्रम आलाहिदा दै. वर्तमानपत्रामध्ये / पुणे महानगरपालिकेच्या / MKCL च्या संकेतस्थळावर प्रसिध्द केला जाईल.

४४) परिक्षा शुल्क :-

सदर भरतीप्रक्रियेत खालीलप्रमाणे परिक्षा शुल्क आकारले जाणार असून सदर परिक्षा शुल्क हे ना परतावा राहील.

१) खुला प्रवर्ग :- रूपये २००/- (अक्षरी रूपये दोनशे फक्त) + बँकेचे शुल्क

२) मागास प्रवर्ग :- रूपये १५०/- (अक्षरी रूपये एकशे पन्नास फक्त) + बँकेचे शुल्क

३) माजी सैनिक :- परिक्षा शुल्क नाही. तथापि त्यासाठी त्यांनी सैनिकी सेवेचा कालावधी पूर्ण केलेबाबतच्या कार्यमुक्त पत्राची साक्षांकित प्रत स्कॅन करून ऑन लाईन अपलोड करणे बंधनकारक आहे. सदर कार्यमुक्त पत्राची प्रत सादर न केलेस वर नमूद केलेप्रमाणे परिक्षा शुल्क भरणे आवश्यक राहिल.

(अधिक माहिती मिळण्याचे ठिकाण: पुणे मनपाचे www.punecorporation.org या संकेतस्थळावर Recruitment या ठिकाणी उपलब्ध केलेली लिंक http://pmc.erecruitment.co.in आणि http://pmc.erecruitment.co.in ही वेबसाईट. सदर दोन्ही लिंक दि.०३/०३/२०१४ पासून कार्यरत होतील.)

**(सही/-)**
**महापालिका आयुक्त**
**पुणे महानगरपालिका**

**दिनांक: १/०३/२०१४**
**ठिकाण- पुणे**